# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/ ५४६१ /२०१८

पुणे शहर, दिनांक ०६.०६.२०१८.

**विषय :- आशियाई टेनिस स्पर्धेसाठी निवड झालेल्या कु.ऋतुजा भोसले हिचा वाहतुक शाखेत सत्कार केले बाबत.**

वाहतुक शाखा पुणे शहर येथील स्वारगेट वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी श्री.संपतराव भोसले यांची कन्या कु. ऋतुजा संपतराव भोसले हिची आशियाई टेनिस स्पर्धा-२०१८ करीता निवड झाली असून तिला पुढील स्पर्धेकरीता सुभेच्छा देण्याकरीता, पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्री. अशोक मोराळे यांनी कु. ऋतुजा व तिचे कुटूंबीय यांना दिनांक- ०५/०६/२०१८ रोजी,वाहतुक शाखा कार्यालय येथे आमंत्रित केले होते. सदर कार्यक्रमात कु. ऋतुजा हिच्या टेनिस खेळाबाबतची लहानपणा पासून केलेल्या तयारीची व कु. ऋतुजाने केलेल्या सरावाची,जिंकलेल्या स्पर्धांची सविस्तर माहिती तिचे वडील पोलीस निरीक्षक, श्री.भोसले यांनी दिली.

कु.ऋतुजा ही पोलीस कन्या असुन तिने तिचे आई-वडीलांचे तसेच तिचे वडील पोलीस दलात असल्याने अप्रत्यक्ष पोलीस दलाचेही नाव उंचविले असल्याने तिने पुढे होणा-या आशियाई टेनिस स्पर्धेत विजयी व्हावे याबाबत पोलीस उप आयुक्त,वाहतुक श्री.अशोक मोराळे यांनी तिला पुष्पगुच्छ देऊन यथोच्छित सत्कार केला. सदर कार्यक्रमास तिचे आई, वडील व वाहतुक शाखेकडील सहा.पोलीस आयुक्त, श्री. भामरे, श्री.पाटील,श्री.ढमाले असे व सर्व वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी हजर होते.

